**आकाशवाणी नागपूर**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शुक्रवार दिनांक ०४ एप्रिल २०२५**

**ठळक बातम्या**

1. **जगाच्या कल्याणासाठी बिम्सटेक हे उपयुक्त व्यासपीठ असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन.**
2. **महाराष्ट्र, ओदिशा आणि छत्तीसगड या तीन राज्यांमधील 15 जिल्ह्यांना व्यापणाऱ्या चार मल्टीट्रॅकिंग प्रकल्पांना केंद्रीय मंत्रिमंडळाची मान्यता, गोंदिया-बल्हारशाह दुपदरीकरणाचा समावेश.**
3. **वर्ष 2024-25 ते 2028-29 या आर्थिक वर्षांसाठी "व्हायब्रंट व्हिलेजेस प्रोग्राम-II योजनेला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी**.
4. **बारमाही झऱ्यांच्या सोबतीने वन वैभवासह व्याघ्र दर्शनासाठी पेंच प्रकल्पातील बनेरा सफारी गेट सज्ज.**
5. **नागपूरच्या प्राचीन पोद्दारेश्वर राम मंदिरातुन श्रीराम जन्मोत्सव शोभायात्रा येत्या रविवारी निघणार.**

**बिम्सटेक**

जगाच्या कल्याणासाठी बिम्सटेक हे उपयुक्त व्यासपीठ असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. बँकॉक इथं सहाव्या बिम्सटेक संमेलनात आज ते बोलत होते. बिम्सटेक ही दक्षिण आणि आग्नेय आशियाई देशांची संघटना असून सदस्य देशांमधे सहकार्यासाठी २१ कलमी कार्यक्रम पंतप्रधानांनी प्रस्तावित केला. बिम्सटेक चेंबर ऑफ कॉमर्सच्या स्थापनेची घोषणा करून त्यांनी सांगितलं की त्याची व्यावसायिक बैठक दरवर्षी होईल. आपत्ती व्यवस्थापनातल्या उत्कृष्टतेचं केंद्र भारतात स्थापन करण्याची घोषणाही त्यांनी केली. त्यात बिम्सटेक देशातल्या ३०० युवकांना दरवर्षी प्रशिक्षण दिलं जाईल, असं त्यांनी सांगितलं. तसंच दरवर्षी भारतात बिम्सटेक पारंपरिक संगीत उत्सव आयोजित केला जाईल, असं ते म्हणाले.

**संसद संस्थगित**

संसदेच्या दोन्ही सभागृहांच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचं कामकाज आज संस्थगित झालं. ३१ जानेवारी रोजी सुरू झालेल्या या अधिवेशनात ११८ टक्के काम झालं असून १६ विधेयकं पारित झाल्याचं लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी आपल्या समारोपाच्या भाषणात सांगितलं. वक्फ सुधारणा विधेयकावर लोकसभेत १४ तास, तर राज्यसभेत १७ तास चर्चा झाल्याचं संसदीय कार्य मंत्री किरेन रिजिजू यांनी सांगितलं. हे विधेयक सरकारने बळजबरीने पारित करून घेतल्याचा काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी यांचा आरोप रिजिजू यांनी फेटाळून लावला. सभापती ओम बिर्ला यांनीही हे विधान दुर्दैवी असल्याचं म्हटलं आहे.

**वक्फ सुधारणा**

वक्फ (सुधारणा) विधेयक,२०२५ काल राज्यसभेत मंजूर करण्यात आलं. सुमारे १२ तासांच्या चर्चेनंतर १२८ सदस्यांनी या विधेयकाच्या बाजूनं, तर ९५ सदस्यांनी या

विधेयकाच्या विरोधात मतदान केलं. हे विधेयक लोकसभेत आधीच मंजूर झालं आहे. या विधेयकाचा लाभ केवळ आणि केवळ मुस्लिम समुदायाला होणार असून, वक्फ बोर्डाकडे असलेल्या संपत्ती व्यवस्थापनात बिगर मुस्लिम समुदायाचा हस्तक्षेप असणार नाही, असं अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरेन रिजिजू यांनी चर्चेला उत्तर देताना सांगितलं.

***हम चाहते हैं कि सबको डिसीजन मेकिंग का बॉडी में जगह मिलना चाहिए। इसलिए सबको एम्पावरमेंट कर रहे हैं। एफिशिएंसी को हम इन्क्रीज़ करने के लिए टेक्नोलॉजी का इस्तेमाल करने का भरपूर इसमें प्रावधान किया गया है।ऑफ़ सेंट्रलाइज्ड डेटाबेस होगा, डिजिटल पोर्टल होगा जो सारा स्टेट बोर्ड के साथ में लिंक होगा। लाइव होगा वर्क प्रॉपर्टी का कंटीन्यूअसली रजिस्ट्रेशन ट्रैकिंग, कंप्लाइयेन्स पूरा व्यवस्था करके हमने एफिशिएंसी को टारगेट दिया है।***

राज्यसभेत काल या विधेयकावर झालेल्या चर्चेदरम्यान, सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांनी विधेयकाचं स्वागत केलं, तर विरोधी पक्षांनी विधेयकाविरुद्ध आणि केंद्र सरकारविरुद्ध टीकेचा सूर लावला होता. संसदेनं मुस्लिम वक्फ रद्द करणे विधेयक २०२५ लाही मान्यता दिली, ज्याच्या प्रभावामुळे मुस्लिम वक्फ कायदा १९२३ रद्द होतो. हे विधेयकही काल राज्यसभेत मंजूर करण्यात आलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी वक्फ सुधारणा विधेयक संमत झाल्याबद्दल समाधान व्यक्त केलं आहे.

**रेल्वेप्रकल्प**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्याआर्थिक व्यवहार विषयक मंत्रिमंडळ समितीने रेल्वे मंत्रालयाच्या चार प्रकल्पांनामंजुरी दिली आहे, ज्यांचा एकूण खर्च अंदाजे 18 हजार 658 कोटी रुपये आहे. महाराष्ट्र, ओदिशाआणि छत्तीसगड या तीन राज्यांमधील 15 जिल्ह्यांना व्यापणाऱ्या या चार प्रकल्पांमुळे भारतीय रेल्वेचं विद्यमानजाळे सुमारे 12 शे 47 किलोमीटरने वाढेल.या प्रकल्पांमध्ये गोंदिया- बल्हारशाह दुपदरीकरण प्रकल्पाचा देखील समावेशआहे. या प्रकल्पांअंतर्गत 19 नवीन स्थानके बांधली जातील, ज्यामुळे गडचिरोली आणि राजनांदगाव या दोन आकांक्षित जिल्ह्यांदरम्यान संलग्नता वाढेल.मल्टी-ट्रॅकिंग प्रकल्पामुळे सुमारे 3 हजार 350 गावे आणि सुमारे सवा 47 लाखलोकसंख्येची संलग्नता वाढणार आहे.

**व्हायब्रंट व्हिलेजेस प्रोग्राम-II**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज व्हायब्रंट व्हिलेजेस प्रोग्राम-II योजनेला केंद्रीय क्षेत्र योजना म्हणून मान्यता देण्यात आली. हा कार्यक्रम व्हीव्हीपी-I अंतर्गत आधीच समाविष्ट असलेल्या उत्तर सीमेव्यतिरिक्त, आंतरराष्ट्रीय भू सीमेला लागून असलेल्या गटांमधील गावांचा व्यापक विकास करण्यास मदत करेल. एकूण 6 हजार 839 कोटी रुपयांच्या खर्चासह, हा कार्यक्रम अरुणाचल प्रदेश, आसाम, बिहार, गुजरात, जम्मू-काश्मीर, लडाख, मणिपूर, मेघालय, मिझोराम, नागालँड,

पंजाब, राजस्थान, सिक्कीम, त्रिपुरा, उत्तराखंड, उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगाल या प्रदेशांमधील निवडक मोक्याच्या गावांमध्ये आर्थिक वर्ष 2028-29 पर्यंत राबविला जाईल.

**रुग्ण मृत्यू**

पुणे इथल्या दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात तातडीने उपचार न मिळाल्याने तनिषा भिसे या रुग्ण स्त्रीला आपला प्राण गमवावा लागला. ही घटना अत्यंत दुर्दैवी असून, शासनाने याची गंभीर दखल घेतली आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी तज्ज्ञ डॉक्टरांच्या समितीद्वारे करण्याचे आदेश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले आहेत. तसेच मेडिकल एथिक्स जपले जावे यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भर दिला.....

***विशेषता धर्मदाय रुग्णालयांनी आपली भूमिका योग्यप्रकारे निभावली पाहिजे. अशाप्रकारची आपली सर्वांचीच अपेक्षा आहे आणि म्हणूनच या संदर्भात मी एक हाय लेवल कमिटी तयार केलेली आहे. या घटनेचा तर त्याठिकाणी तपास करेलच पण त्यासोबत अशा घटना होऊ नये म्हणून धर्मादाय रुग्णालयांवर कशाप्रकारे आपल्याला नियंत्रण करता येईल आणि विशेषता मेडिकल एथिक्स हा एक महत्त्वाचा विषय आहे कि अशा प्रकरणी पैशाची चिंता न करता त्यांना ॲडमिट करून देणं गरजेच होत त्यांना एथिक्सच पालन होत आहे कि नाही, या संदर्भात देखील आपण प्रयत्न करणार आहोत.***

**नरभक्षी वाघ**

भंडारा जिल्ह्याच्या लाखांदूर वनविभागातर्फे नरभक्षी वाघाला पकडण्यात आज यश आलं आहे. गेले तीन दिवसांपासून वनविभागातर्फे वाघाचा शोध घेण्यात येत होता. या वाघानं लाखांदूर तालुक्यातील खैरी इथल्या शेतकऱ्यावर हल्ला करून त्याला ठार केल्याची घटना नुकतीच घडली आहे.

**पेंच प्रकल्प**

नागपूरपासून अवघ्या तासाभराच्या प्रवासानंतर पेंच व्याघ्र प्रकल्पातील बनेरा सफारी गेटच्या मार्गे पेंच व्याघ्र प्रकल्पाला भेट देऊन निसर्गातील बारमाही झरे आणि जैववैविध्य वन्यजीवांसह अनुभवण्यासाठी मोठ्या प्रमाणात पर्यटकांची व्यवस्था व्हावी, या दृष्टीने वनविभागाने चपखल नियोजन केले आहे. safaribooking.mahaforest.gov.in या संकेतस्थळावर सर्व प्रकारची माहिती उपलब्ध करून देण्यात आली आहे. येत्या काही दिवसातच कोलीतमारा ते कुंवारा भिवसेन सोलर लक्झरी बोटच्या माध्यमातून ही सफारी अधिक रंजक होईल, असे वनविभागाच्या वतीने कळविण्यात आले आहे.

**शोभा यात्रा**

प्रभू रामचंद्राच्या जन्मोत्सवानिमित्त नागपुरात पोद्दारेश्वर राम मंदिरात आयोजित होणारी श्रीराम जन्मोत्सव शोभायात्रा येत्या रविवारी आयोजित करण्यात आली असल्याची माहिती मंदिराचे व्यवस्थापक विश्वस्त पुनीत पोद्दार यांनी एका पत्रपरिषदेत दिली. रविवारी दुपारी 4 वा. मंदिरातील उत्सवमूर्ती प्रमुख रथात विराजमान होतील. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, माजी राज्यपाल बनवारीलाल पुरोहित, पोलिस आयुक्त रवींद्रकुमार सिंघल, मनपा आयुक्त आणि सर्वपक्षीय आमदारांच्या हस्ते श्रीराम

पंचायतनाचे पूजन होऊन शोभायात्रेस प्रारंभ होईल. शोभायात्रेत स्केटींग पथक, प्रतिहारी दल, अश्वमेधाचा घोडा,शंखनाद दल, भजन मंडळी, नटराज क्रीडा मंडळाचं आदिवासी नृत्य, रामायण मंडळ, राम संकीर्तन दल, जस गायन आदींसह, बांकेबिहारी दर्शन, महालक्ष्मी जगदंबा कोराडी दर्शन, पंचमुखी हनुमान, प्रयागराज महाकुंभ असे प्रमुख 90 चित्ररथ राहणार आहेत. शोभायात्रेच्या व्यवस्थेसाठी संपूर्ण मार्गावर स्वागतद्वार, कमानी, रामायणातील देखावे, दिव्यांची रोषणाई यासह संपूर्ण मार्गावर शोभायात्रेचे समालोचन राहणार आहे. रामजन्मोत्सव शोभायात्रा दुपारी 4 वा. प्रारंभ होईल, त्यानंतर ती इतवारी शहीद चौकात 6 वा. , महाल येथे सायं. 7.30 वा., कॉटन मार्केट येथे रात्री 9वा. आणि सीताबर्डी येथे रात्री 10 वा. पोहोचण्याची शक्यता आहे.

**मनोजकुमार निधन**

हिंदी चित्रपटसृष्टीतले ज्येष्ठ अभिनेते आणि दिग्दर्शक मनोजकुमार यांच्या निधनामुळे चित्रपटसृष्टीवर शोककळा पसरली आहे. मनोजकुमार यांचं आज सकाळी मुंबई इथल्या कोकिलाबेन अंबानी रुग्णालयात निधन झालं. ते ८७ वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिव देहावर उद्या सकाळी अकरा वाजता शासकीय इतमामात अंत्यसंस्कार होणार आहेत.

******